**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

## प्रेसनोट                    दिनांक - ०४/०९/२०२३

### दि.०३/०९/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव एमआयडीसी २२८/२०२३ भादवि कलम ३०७,४९८ (अ),३२३,५०४,५०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | सन २०१० पासुनते दि-०९/०८/२०२३ रोजीचे रात्री १२.०० वा चेदरम्यान वेळावेळी फिर्यादी यांचे राहते घरीकोटेश्वरवाडी गावी |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०९/२०२३ रोजी १९/५७ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | दिलीप हरीभाउ दाभाडे वय-५१ वर्षे ,रा.कोटेश्वरवाडीता मावळ जि पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे चारीत्र्यावर संशय घेउन तसेच घरगुती किरकोळ कारणावरुन व सदर गुन्हयातील आरोपी याला सीओडी डेपो देहुरोड कडुन भविष्यात मिळणा-या पेन्शनला पत्नी म्हणुन यातील फिर्यादी यांचे नाव लावावे यासाठी फिर्यादी यांनी सीओडी डेपो देहुरोड येथे विनंती अर्ज केल्याचे कारणावरुन त्यांना फिर्यादीस त्यांचे पती आरोपी मजकुर यांनी वेळोवेळी हाताने मारहाण करुन,शिवीगाळी, दमदाटी करुन फिर्यादी यांचा शारीरीक व मानसिक छळ करुन घरातील चाकुने फिर्यादी यांना मारुन टाकण्याचे उददेशाने फिर्यादी यांचे गळयावर चाकुने वार केला असुन त्यामध्ये त्यांचा गळा व डावे हाताचे तीन बोटाच्या नसा कापल्या आहेत म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि/चव्हाण मोनं ९३०७००७१३७ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण .- ७०२/२०२३ भादवि कलम ३२४,३२३, ५०४,५०६,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०२/०९/२०२३ रोजी २०/०० वा. चे.सु।। शिवाजी विद्यालय, मांजरे स्टिल दुकानाजवळ रोडवर चाकण ता.खेड जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०९/२०२३ रोजी ०१/५९ वा |
| फिर्यादी | :- | जीवन विक्रम जाधव वय-२१ वर्षे धंदा-रिक्षाचालक, रा.महात्माफुलेनगर, काळुसरोड,चाकण ता.खेड जि.पुणे |
| आरोपी | :- | १)अमोल विश्वनाथ लाटुकर वय २७ वर्षे रा एकतानगर चाकण ता खेड जि पुणे<br>२) पराग बबन गायकवाड वय २० वर्षे रा खंडोबामाळ, चाकण ता.खेड जि.पुणे जि.पुणे ३)विवेक कु-हाडे<br>**४) विधीसंघर्षित बालक    आरोपी क्र १ व २ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी रिक्षा नं.एम.एच.१४-जे.के-४४०९ हिचेत पॅसेंजर घेऊन खंडोबा माळ येथे सोडुन पुन्हा चाकण येथे येत असताना सदर ठिकाणी आले असता तेथे आरोपी क्र १ ते ३ व विधीसंघर्षित बालक हे सर्वजण तेथे मोटारसायकल लावुन थांबले होते. त्यांनी फिर्यादी यांना रिक्षात टेपचा जोरात आवाज का केला आहे, तु आम्हाला ओळखतो का, फिर्यादी यांनी त्यांना काय झाले असे विचारले त्या कारणावरुन चिडुन आरोपी क्र १ ते ३ व विधीसंघर्षीत बालक यांनी फिर्यादी यांना हाताने मारहाण करणेस सुरुवात केली तेवढ्यात आरोपी क्र १ याने तेथे पडलेला फरशीचा तुकडा फिर्यादीचे डोक्यास, कपाळावर मारुन जखमी केले. तसेच सर्वांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोना चव्हाण ९४०४६५१३२३ |

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ७०३/२०२३ भादवि का कलम ३२४,५०४, ५०६,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. ०२/०९/२०२३ रोजी २२.०० वा. चे सुमारास गोल्डन चौक खंडोबा माळ चाकण येथे

गुन्हा दाखल :- दि.०३/०९/२०२३ रोजी ०२/२० वा

फिर्यादी :- प्रदिप भागवत पौळ वय-२० वर्षे धंदा-मजुरी ,रा .महात्माफुले नगर काळूस रोड,चाकण ता खेड जि पुणे

आरोपी :- १.पराग बबन गायकवाड , वय २० रा.खंडोबामाळ, चाकण ता.खेड जि.पुणे , २.रोहन घोगरे (पुर्ण नाव माहीत नाही) रा.खंडोबामाळ चाकण ता.खेड जि.पुणे, **आरोपी क्र १ अटक आहे, विधीसंघर्षित बालक-२**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा मित्र नामे जीवन जाधव यास शिवाजी विद्यालय,मांजरे दुकानाजवळ अमोल लाटुकर रा. एकतानगर वाकी ता.खेड जि.पुणे याने त्याचे मित्रासह त्यास मारहाण केली म्हणुन त्याचेविरुध्द तक्रार देण्यासाठी चाकण पोलीस स्टेशन येथे आले व त्यानंतर घरी जात असताना सदर ठिकाणी आरोपी क्र १ व २ व त्यांचे सोबत असणारे २ विधीसंघर्षित बालक हे सर्वजण तेथे आले व त्यांनी फिर्यादी यांना तु पोलीस स्टेशनला आमच्याविरुध्द तक्रार देण्यासाठी जातो असे म्हणुन फिर्यादीचे डोक्यात लोखंडी रॉड मारला व त्याचेसोबत असलेले इतर आरोपींनी फिर्यादी यांना आळीपाळीने हाताने मारहाण करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली ,शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा रेंगडे ९९२२४३५९५३

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी १०४३/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०३/०९/२०२३ रोजी सकाळी ०६/३० वा सुमारास वाकड ब्रिज जवळ पी.एम.आर.ए ८/१३, मधुबन हॉटेल समोर विठ्ठल मंदीरा समोर हिंजवडी

गुन्हा दाखल :- दिं.०३/०९/२०२३ रोजी १३/३४ वा

फिर्यादी :- संकेत सुखदेव राऊत वय २६ वर्षे धंदा-नोकरी रा.सुरज जाधव यांची रुम रुम नं. १०१ जाधव बिल्डींग, सिंहगड

आरोपी :- १)प्रथमेश पमेश सोनवणे वय-२२ वर्षे धंदा-रिक्षा चालक रा. खिंवसरा शाळेजवळ गणेशनगर थेरगाव पुणे मुळ गाव-मु.पो.वाडा ता.खेड , २) धर्मा बुवाजी भोसले वय-३१ वर्षे धंदा-मजुरी रा.सदानंद हॉटेलचे पाठीमागे लेबर कॅम्प बाणेर पुणे, मुळ गाव- मु.पो. बामणी पो.मांजरी ता.सांगोला जि.सोलापुर , ३) महीप्या लक्ष्मण पाटेकर, काळेवाडी फाटा, थेरगाव, पुणे, **आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी मेट्रोचे सामान ५०००/- रु किं चे १० लोखंडी सेंटरींग प्लेटा वाकड ब्रिज जवळ पी.एम.आर.ए ८/१३, मधुबन हॉटेल समोर हिंजवडी येथुन रिक्षा नं. एम.एच.१४ /सी.यु.०७६० यामधिल आरोपी क्रं १ ते ३ यांनी फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे इरादयाने स्वताचे फायदयाकरीता चोरुन नेल्या आहेत म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोना १८५३ बाबर, ९८५०७०१६५४

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- देहुरोड ४९२/२०२३ भा.द.वि.क.३०४ (अ) २७९ ३३७, ३३८ मो.वा.का.कलम १८४,१३४/१७७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०२/०९/२०२३ रोजी ०६/३० वा. चे सुमारास, देहुरोड ते निगडी जुना पुणे मुबंई हायवेवर केंद्रीय विद्यालयासमोर -१चे समोर जात असतांना.

गुन्हा दाखल :- दिं.०३/०९/२०२३ रोजी वेळ २०/०१

फिर्यादी :- अक्षय सुनिल गुंड ,वय ३०वर्षे- धंदा ,नोकरी रा. सिताई रेसिडेन्सी सी विंग रूम नं.३०२ पवनेश्वर मदिराजवल ,पिंपरीगाव ता.हवेली

आरोपी :- अज्ञात वाहन चालक

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा भाऊ सागर सुनिल गुंड वय ३१ वर्षे हा होंडा अँक्टीवा मो.सायकल

क्रमांक एम. एच.१४/ई.एक्स १९३१ वरून देहुरोड ते निगडी जुना पुणे मुंबई हायवेवर केंद्रीय विद्यालयासमोर - १ चे समोर जात असतांना कोणीतरी अज्ञात वाहनावरील, अज्ञात वाहन चालकाने हयगयीने भरगाव वेगात,रस्त्याचे परिस्थीकडे दुर्लक्ष करुन सागर यांचे ताब्यातील होंडा अँक्टीवाला जोरात धडक दिल्याने पडून डोक्याला गंभीर जखमी करून त्यास कोणत्याही प्रकारची वैद्यकीय मदत न करता त्याचे मृत्युस कारणीभुत झाला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि थिटे मो.नं.९९७०६६९८०९

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ५८८/२०२३ भा.दं.वि कलम ३२४,३२३, ५०४,५०६, ४२७,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.३१/०८/२०२३ रोजी संध्याकाळी ०७/३० वाजता सुमारास अन्नपुर्णा पिठाची गिरणी समोर सार्व रोडवर गल्ली क्रमांक १ धर्मराज नगर पाटील नगर चिखली पुणे येथे व फिर्यादी यांचे राहते घरासमोर सार्व

गुन्हा दाखल :- दि०३/०९/२०२३ रोजी १९/१९ वाजता.

फिर्यादी :- केतन कृष्ण वाघमोडे वय २२ वर्ष धंदा नोकरी रा.धर्मराज नगर कॉलनी नंबर १,पाण्याची टाकीजवळ,गट नबर १५९२ पाटीलनगर चिखली पुणे

आरोपी :- १.अविनाश गायकवाड वय वय अंदाजे २४ वर्ष रा.कॉलनी नंबर ३ धर्मराज नगर पाटीलनगर चिखली पुणे
२.अ.क्र १ अविनाश गायकवाड चा मित्र नांव पत्ता माहीती नाही
३.दोन अनोळखी महीला नांव पत्ता माहीती नाही
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी त्याचे राहते घरी जात असताना गल्ली क्रमांक १ मध्ये वळत असताना तेथे एक चारचाकी मारुती व्हॅन रस्ताचे मध्ये थांबलेली असल्याने फिर्यादी यांस जाता येत नव्हते म्हणुन फिर्यादी यांनी गाडीचा हॉर्न वाजविला म्हणुन आरोपी क्रं १ व २ यांनी फिर्यादीस वाईट वाईट शिवीगाळ करुन हाताने मारहाण करुन परत फिर्यादी यांचे गाडीचे नुकसान केले तसेच आरोपी दोन अनोळखी महीला तेथे येऊन वाईट वाईट शिवीगाळी करुन फिर्यादी व त्याचे आई वडीलांना हाताने मारहाण केली व आरोपी क्रं १ याने रस्तात पडलेला दगड उचलुन फिर्यादी यांचे आईचे डोक्यात मारुन तिला जखमी केले,व फिर्यादीस माझे नादी लागायचे नाही. नाहीतर सर्वाना मारुन टाकील अशी धमकी देऊन, निघुन गेले,म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा १०२६ चोरगे ९९२२५६५०५६

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी १०४४/२०२३ भा.द.वि. कलम ४०६,४२० प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२८/०६/२०२३ रोजी ते दि.०३ जुलै २०२३ दरम्यान हयात हॉटेल व तमन्ना हॉटेल हिंजवडी ता.मुळशी जि.पुणे

गुन्हा दाखल :- दिं.०३/०९/२०२३ रोजी १५/४६ वा

फिर्यादी :- युवराज विठठल कांबळे वय २६ वर्षे मुळ रा.येळदळी ता.जत.जि.सांगली सध्या रा.पदमजी पेपर मिल जवळ बारणे कॉर्नर साने चाळ थेरगाव

आरोपी :- १) महिला आरोपी मोबाईल नंबर ७५५८५३९०८९
२.मोहीत गोयेल वय ३२ वर्षे मोबाईल नंबर ८२६९८७४१८२
३. आकाश शिगळे मोबाईल नंबर ७४११०९८७९७,
४. गोविंद पाटील मोबाईल नंबर ८२७५६५४९४०
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर यांनी संगणमत करुन फिर्यादी यांना हिंजवडी येथील तम्हन्ना हॉटेल,हयात हॉटेल येथे बोलावुन घेवुन ,मार्केट नेटवर्ककिंग मध्ये जॉब आहे असे सांगुन खोटे सांगुन सदर जॉबसाठी दिड लाख रुपये भरावे लागतील असे सांगीतले असता फिर्यादी यांनी त्यांना माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगीतल्यानंतर आरोपी मजकुर यांनी फिर्यादीस तु आम्हांस फक्त तुझे आधारकार्ड दे आणी तुला प्रत्येक

आठवडयाला खात्यावर पैसे येतील असे सांगितल्याने फिर्यादीने आधारकार्ड दिल्यानंतर आरोपी यांनी फिर्यादीचे नावे विफीन फाईनान्स चे लोन १,३७,०२९/- रुपये किं फिर्यादीचे माहितीशिवाय खात्यावर घेवुन फिर्यादीचे खात्यावर पैसे आल्यावर आरोपी क्रं १ हीने फिर्यादी यांना हिंजवडी येथील हयात हॉटेल येथे बोलावुन घेवुन फिर्यादी कडुन त्यांचा फोन घेवुन फिर्यादीचे खात्यावरुन तिच्या खात्यावर १५,०००/- रुपये व ८०,०००/- रुपये तिच्या नावावर ऑनलाईन घेतले तसेच ५०,०००/- रुपये हे तिच्याच ओळखीच्या कोणाच्यातरी नावावर पाठवले असे एकुण १,४५,०००/- रुपयांची सर्वांनी मिळुन फिर्यादीची फसवणुक करुन पैशांचा अपहार केला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि यलमार, ९४२३२३९९४